CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २६९ वा ▶ मंगळवार दि. २५ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## पवार हे मुख्यमंत्री होणार नाही याची त्यांना पूर्वकल्पना: फडणवीस



**मुंबई ।** महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत आणि तेच राहणार आहेत, असा स्पष्ट निर्वाळा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. विधीमंडळ अधिवेशनानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत सुरू असलेल्या चर्चेवर भाष्य करत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. अजित पवार हे मुख्यमंत्री होणार नाही, याची त्यांना पूर्वकल्पना असल्याचाही गौप्यस्फोट फडणवीस यांनी केला. मागील काही दिवसांपासून राज्यात मुख्यमंत्री बदलाच्या चर्चा सुरू आहेत.

### न्यूज कॉलम

#### जिल्हाधिकारी गोयल यांनी स्वीकारला पदभार



**धुळे ।** धुळेच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्त झालेले अभिनव गोयल यांनी जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार काल स्वीकारला. जिल्हाधिकारी यांच्या दालनात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडून श्री. गोयल यांनी आज सकाळी धुळे जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारण्याची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी औपचारिक ओळख करुन संवाद साधला.

#### रिटायर्ड पीएसआयलाही घातला १ लाखाचा गंडा

**धुळे ।** मुंबई पोलिस दलातून पीएसआय म्हणून सन २०२१ मध्ये निवृत्त झालेले किशोर दिगंबर पाटील यांचे नातलग देवपुरात राहतात. त्यापैकी एकाचा मृत्यू झाल्यामुळे ते दशक्रिया विधीसाठी आले होते. दत्त मंदिर येथील एटीएम सेंटरवर पैसे काढण्यासाठी ते गेले होते. यावेळी अज्ञात व्यक्तीने हातचलाखीने त्यांचे एटीएम कार्ड बदलले. त्यानंतर किशार पाटील यांच्या खात्यातून परस्पर एक लाख ६ हजार रुपये काढून घेण्यात आले.

# वाहनाच्या गर्दीत पायी चालायचे कसे?

## पोलिसांची आक्रमक कारवाई; सूचना न ऐकणाऱ्या व्यापाऱ्यांना दिला दणका

**पुरुषोत्तम पाटील । धुळे**

शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या आग्रा रोडवरील अतिक्रमणासह वाहतुकीला अडथळा ठरणार्या हातगाडीधारकांवरही पोलिसांनी कारवाई केली. यापूर्वी पोलिसांनी आग्रा रोडवरील व्यापारी आणि हातगाडीधारकांना रस्त्यावरील अतिक्रमणे हटवण्याची लेखी सूचना केली होती. त्यानंतरही रस्त्यावरील अतिक्रमण न हटवल्याने सकाळी ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईमुळे रस्त्यावरील सर्व अडथळे दूर झाल्याने आग्रा रोड वाहतुकीसाठी पूर्णपणे मोकळा झाला. तसंच पुन्हा रस्त्यावर अतिक्रमण केल्यास किंवा रस्त्यात हातगाड्या लावल्यास फौजदारी करवाईचा इशाराही पोलिसांनी दिला आहे. शहरातील आग्रा रोडवर अवैध पार्किंगसह लोटगाडीवाल्यांनी जागा अडवून ठेवली परिणामी अपघाताचा धोका वाढला होता वारंवार सांगूनही त्याचा उपयोग होत नसल्याने अखेर सोमवारी सकाळी विशेष मोहीम राबविण्यात आली पाचकंदिल चौक ते महात्मा गांधी पुतळापर्यंत रस्त्याच्या मधोमध असलेल्या लोटगाड्यांवर कारवाई करण्यात आली. वाहतूक पोलिसांनी या दोन विभागाने ही मोहीम राबविली. शहरातील आग्रा रोडवर महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापासून ते चाळीसगाव रोड क्रॉसिंगवरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत सारखीच स्थिती होती बिनधास्तपणे लोटगाडी रस्त्याच्या मधोमध लावली जात होती. पाच कंदिलच्या चौकात तर ही स्थिती दिवसभर कायम असायची यापुर्वी महापालिका आणि पोलीस यांच्या संयुक्त विद्यमानाने ही अतिक्रमण हटाव मोहीम या भागात राबविण्यात आली आहे पण, तेवढ्यापुरता लोटगाडीवाले बाजूला सरकत होते पुढे कारवाई केल्यानंतर मागे पुन्हा परिस्थिती जैसे थेच होत होती. अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली या मार्गावर पुन्हा अतिक्रमण होणार नाही अशी तंबी देत त्यांच्याकडील साहित्य जमा केले काही काळ तणाव निर्माण झाला होता. शहरातील आग्रा रोडसह अन्य ठिकाणी वाहतुकीचे तीनतेरा वाजलेले आहेत.

याठिकाणी अवैध पार्किंगसह बिनधास्तपणे लोटगाड्या उभ्या करुन रस्ता अडविण्याचा प्रयत्न केला जात होता यामुळे अपघाताचा धोका वाढला होता. मोहीम टप्प्या-टप्प्याने राबविण्यात येणार असून रस्ता मोकळा केला जाणार आहे. शहरातील आग्रा रोडवर सर्वाधिक वर्दळ असते सर्वांचाच वावर याच रस्त्यावर असल्यामुळे पथारीवाले, लोटगाडीवाले या ठिकाणी येऊन आपला व्यवसाय करत असतात त्यांनी रस्त्याच्या एका कडेला आपला व्यवसाय करणे अनिवार्य असताना मात्र रस्त्यावरच येऊन पाचकंदिल चौकात व्यवसाय करीत असल्याचे वारंवार समोर येत होते प्रशासनाने तडकाफडकी मोहीम राबविली खरी, पण हे काम अव्याहतपणे सुरु राहिले तर त्याचा उपयोग आहे नाहीतर काहीही उपयोग नाही.

### वाहतुकीच्या कोंडीचा प्रश्न गंभीर

**मुंबई- आग्रा महामार्गालगत चाळीसगाव रोड चौफुली, बारापत्थर, गल्ली क्रमांक चार, तहसील कार्यालय, जेल रोड, आग्रा रोड, नेहरू चौक, पंचवटी परिसर, दत्तमंदिर चौक, साक्री रोड, शिवतीर्थ, अंजनशाह दाता दर्गा, गांधी पुतळा, नगरपट्टी या ठिकाणी वाहतुकीच्या कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे.**



### फुटपाथ कागदावरच

**आग्रा रोडवर कोणत्याही प्रकारचा फुटपाथ नाही. जो काही असेल तो केवळ कागदावरच असेल, असे म्हणायला हरकत नाही. फुटपाथ असतो अशा ठिकाणी पथारीवाल्यांनी जागा बळकावून घेतली असल्याचे दिसून येते.**



### अतिक्रमण हटाव केवळ दाखवायलाच

**शहरातील वर्दळीच्या असलेल्या आग्रा रोडवर अतिक्रमण हटाव मोहीम पोलिसांची मदत घेऊन वेळोवेळी राबविली गेली आहे. पण, त्याचा फारसा काही उपयोग झालेला नाही. पुन्हा जैसे थेच आहे. अशी देखील चर्चा नागरिकांमध्ये होती.**

### पायी चालायला भीती

कामानिमित्त आग्रा रोडवर आल्यानंतर पायी चालणेदेखील कधी कधी कठीण होते. वाहन चालविणे या मार्गावर शक्य नाही. गर्दी आणि अस्ताव्यस्तमुळे खूप त्रास होत आहे. **- चैताली पाटील, धुळे**

### पायी चालायचे कसे?

आग्रा रोडवर रोज नाही पण वेळोवेळी यावे लागते. वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे पायी चालायचे कसे, हा प्रश्न असून तो अनुत्तरित आहे. वाढणारे अतिक्रमण काढल्यास पायी चालणे शक्य होईल. **- सीमा ठाकरे**



# मनपा क्षेत्रातील समाजोपयोगी वास्तू सेवाभावी संस्थांना वाजवी दरात द्या!

## आ. देवयानी फरांदे यांची विधानसभेत मागणी

### अधिवेशन संपण्यापूर्वी नवीन धोरण जाहीर करण्याचे मंत्री सावंत यांचे आश्वासन

**नाशिक । प्रतिनिधी**



महापालिका क्षेत्रातील विविध समाज मंदिर, वाचनालय, विरंगुळा केंद्र इत्यादी सार्वजनिक प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या वास्तू विविध सेवाभावी संस्थांना देताना महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ याप्रमाणे प्राप्त अधिकारानुसार दि. १३ सप्टेंबर २०१९ रोजी काढलेल्या नियमात मूल्यांकनाच्या ८ टक्के रक्कम किंवा बाजारभावानुसार यापैकी जे जास्त आहे. तेवढे देण्याची तरतूद करण्यात आलेली होती. या नियमातील तरतुदीमुळे अनेक समाज मंदिरे व सार्वजनिक उपयोगी वस्तू बंद अवस्थेत असल्याने या वास्तूंचे नुकसान होत असल्याची बाब आ. देवयानी फरांदे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात मांडली.

भाडे जास्त असल्यामुळे वाचनालय, अभ्यासिका असताना देखील ती विद्यार्थ्यांसाठी खुली करून देता येत नाही. योगा हॉल असताना देखील ज्येष्ठ नागरिकांना बाहेर योगा करणे भाग पडत आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असल्याची बाब आ. देवयानी फरांदे यांनी विधानसभेत मांडली. राज्य शासनाकडून दि. २६ एप्रिल २०२३ रोजी स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण भाडेपट्ट्याचे नूतनीकरण नियम प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. या नियमात धर्मदाय व सार्वजनिक प्रयोजनासाठी बाजार मूल्याच्या २ टक्के पेक्षा कमी नाही अशा पद्धतीने भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समितीद्वारे आकारणी निश्चित करणे बाबत सूचित केलेले आहे. परंतु बाजारभावाचे वाढते दर लक्षात घेता दोन टक्के रक्कम देखील विविध सामाजिक संस्थांना भरणे शक्य नसल्यामुळे रक्कम अधिक प्रमाणात कमी करणे गरजेचे आहे. याबाबत उत्तर देताना प्रभारी नगर विकास मंत्री उदय सावंत यांनी आ. फरांदे यांनी मांडलेल्या नियमावलीत सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे याबाबत अधिनियमत आवश्यक बदल करण्याचे मान्य करतानाच सामाजिक संस्थांना परवडेल अशा प्रकारचे दर लागू करण्याचे आश्वासन दिले. तसेच सदर अधिनियमातील बदल चालू अधिवेशन संपण्यापूर्वी करण्यात येऊन सभागृहाला अवगत केले जाईल असे आश्वासन दिले.

# सोनगीर पोलिसांनी गो-तस्करी रोखली

## कत्तलीसाठी जाणाऱ्या ९ गुरांची सुटका



### वाहनासह सव्वापाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोनगीर । प्रतिनिधी**

वाहनातून कत्तलीसाठी नेणार्या गोवंश जनावरांची सोनगीर पोलिसांनी पाठलाग करून सुटका केली. नऊ गुरे व वाहन असा एकुण पाच लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आज पहाटे तीन वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

सोनगीर पोलिस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पहाटे तीन वाजता पोलिसांना सरवड फाटा ते लामकानी दरम्यान नंदाणे गावाजवळ एक सोनेरी रंगाची महिंद्रा झायलो कंपनीचे वाहन (क्र. एम.एच. १५ ई-७३१२) संशयास्पद वाटले. त्यामुळे पोहेका दराडे व चालक पोकॉ सोनवणे, कमलेश महाले यांनी नंदाणे गावाजवळ वाहन चालकास थांबण्याचा इशारा केला. मात्र चालकाने वाहन आणखी वेगात चालवून पळू लागला. त्यामुळे सोनगीर पोलिसांनी देखील पाठलाग सुरू केला. त्यानंतर झायलो वाहनावरील चालकाने थोड्या अंतरावर वाहन थांबवून अंधारात पळून गेला. वाहनाची तपासणी केली असता त्यात गोवंश जातीचे लहान-मोठे असे नऊ जनावरे दाटीवाटीने कोंबून क्रुरतेने, आखुड दोरीने बांधलेले दिसले. कत्तलीच्या उद्देशाने त्यांची वाहतूक केली जात होती. २७ हजारांची नऊ लहान, मोठे गावराण गोवंशीय जनावरे व पाच लाखांचे वाहन असा एकुण पाच लाख २७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहेकॉ दराडे हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधिक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक गणेश फड, पोहेकॉ दराडे, पोकॉ सोनवणे, कमलेश महाले यांनी केली.

# मणिपूर अत्याचार निषेधार्थ पिंपळनेरमध्ये जन आंदोलन



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

मणिपूर येथील माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटनेच्या निषेधार्थ विविध संघटना मार्फत मुकमोर्चा काढून निषेध व्यक्त करण्यात आला. सामोडे चौफुली ते अप्पर तहसील कार्यालय पर्यंत मुकमोर्चा रॅली काढत निषेधाचे बॅनर, झेंडे, घेऊन शेकडो आदिवासी बांधव रॅलीत सामील झाले.

याप्रसंगी आदिवासी एकता परिषदेचे आप डोंगरभाऊ बागुल, प्रेमचंद सोनवणे, माजी खासदार बापूसाहेब चौरे, युवा नेते प्रवीण बापू चौरे, महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव च्या केंद्रीय महिला संघटक डॉ प्रतिभा देशमुख चौरे, तानाजी बहिरम, अनिता गवळी जयस संघटनेचे अध्यक्ष प्रमोद शिंदे, कुंदन गांगुर्डे, अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव सुभाष जगताप, डॉ जितेश चौरे, जि प सदस्य विश्वास बागुल, आप बापू सोनवणे, भिकन पवार, अनिल गायकवाड, विनोद पवार, बाळू पवार, वंजी पवार, संजय ठाकरे, मुकमोर्चात सामील होते. आंदोलन ऐका जाती धर्माचे पंथाचे नसून ते महिलांची अस्मिता ,रक्षण करण्यासाठी असून सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. एकता परिषदेचे प्रेमचंद सोनवणे यांनी निवेदनाचे वाचन केले. डॉ प्रतिभा देशमुख चौरे यांनी महिला आक्रोश व त्रिव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. माजी खासदार बापूसाहेब चौरे यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला.

# गढूळ पाण्यामुळे तासाला ६०० किलो ब्लिचिंगचा वापर

**धुळे । प्रतिनिधी**



जळगाव जिल्ह्यातील हातनूर धरणाचे दरवाजे उघडल्याने तापी नदीला पूर आला असून, नदीतून गाळयुक्त गढूळ पाणी वाहते आहे. त्याचा फटका शहराच्या पन्नास टक्के भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या तापी पाणीपुरवठा योजनेला बसला आहे. पाण्यात गाळाचे प्रमाण वाढल्याने पाणी पंपिंग करण्यापासून शुद्ध करण्याच्या प्रक्रियेसाठी लागणारा वेळ वाढला आहे.

पूर्वी पाणी शुद्ध करण्यासाठी तासाला सुमारे ८० ते १०० किलो ब्लिचिंग पावडरचा वापर होत होता. आता ६०० ते ७०० किलो पावडर वापरावी लागते. तसेच पूर्वी तीन तास शुद्ध होणारे पाणी आता सहा तासांत शुद्ध होते. त्यामुळे तापी योजनेवरील जलकुंभ भरण्यास विलंब होत असल्याने पूर्वीच्या तुलनेत शहरात दोन दिवस उशिरा पाणीपुरवठा होणार आहे. हतनूर धरण व सुलवाडे बॅरेजचे दरवाजे उघडले आहे. पुरामुळे गढूळ व गाळयुक्त पाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे सुकवद येथील पंपिंग स्टेशनमधून पाणी उचलण्यास विलंब होतो.

माती मिश्रित पाण्यामुळे जलशुद्धीकरणाची प्रक्रिया त्रासदायक झाली आहे. ब्लिचिंग, क्लोरीन, तुरटीचा वापर वाढला आहे. पूर्वी दर तासाला साधारणपणे ८० ते १०० किलो ब्लिचिंग लागत होती. आता हे प्रमाण दर तासाला ६०० ते ७०० किलोवर गेले आहे. तसेच पाण्यातील गाळाचे प्रमाण दिवसभर बदलत असते. त्यामुळे बदलत्या स्वरूपानुसार केमिकलचा वापर करावा लागतो. तसेच जलशुद्धीकरणाचा कालावधी कमी, जास्त होत असल्याची माहिती महापालिकेतर्फे देण्यात आली.

तापी नदीतून वाहणारे पाणी सुकवद येथून बाभळे जलशुद्धीकरण केंद्रात येते. या ठिकाणी पाण्यावर शुद्धीकरणाची प्रक्रिया होते. हे केंद्र शहरापासून ३० किलोमीटर अंतरावर आहे. गाळ मिश्रित पाण्यामुळे जलशुद्धी करणाला विलंब होत असल्याने बाभळे येथून पाणीपुरवठा उशिराने होतो. त्यामुळे जलकुंभ भरण्यास वेळ लागत असल्याने तापी योजनेवरून होणारा पाणीपुरवठा दोन दिवस उशिराने होणार आहे. गाळाचे प्रमाण कमी झाल्यावर नियमित होईल.

# नुकसानग्रस्त नागरिक आणि शेतकऱ्यांना तातडीने १० हजारांची मदत

### अजित पवारांची विधानपरिषदेत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं आणि नागरिकांचं नुकसान झाल्याने त्यांच्या पाठीशी राज्य सरकार राहणार असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने १० हजारांची मदत करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी केली. ते विधानपरिषदेमध्ये निवेदन सादर करत होते. राज्यात उद्भवलेल्या पूरपरिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने त्यांना मदत करण्यात येणार असल्याचं अजित पवार म्हणाले.

### तातडीने पिक पंचनामे करण्याचे निर्देश

**बुलडाणा जिल्ह्यात १०२ मिलीमीटर पाऊस झाला. यामुळे तेथील नदी-नाल्यांना पूर आला होता. वाशिममध्ये १३९.७ मिलीमीटर पाऊस झाला. सरकारने वेगवेगळ्या जिल्ह्यांत मदतकार्य करण्यासाठी काही पथके तैनात केली आहेत. या पावसात मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांना ४ लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने तातडीने पिकांचे पंचनामे करण्याचेही निर्देश दिलेत. घरात पुराचे पाणी शिरून झालेल्या नुकसानीसाठी ५ ऐवजी १० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान मदत देण्याचे निर्देश देण्यात आलेत, असे अजित पवार यांनी सभागृहात सांगितले.**



### स्वस्तात अन्नधान्याचे वाटप

**पुरामुळे शेतजमीन खरडून गेली असेल, तर तिथे पंचनामे करुन पुन्हा त्या जमिनी पूर्ववत करण्यासाठी जो खर्च येईल त्यासाठी सरकार योग्य तो निर्णय घेणार आहे. पीडित व्यक्तींना स्वस्त दरात अन्नधान्याचे वाटप केले जाईल. यासंबंधीचे योग्य ते निर्देश संबंधितांना देण्यात आल्याची माहितीही अजित पवार यांनी यावेळी दिली.**

अजित पवार म्हणाले की, २३ जुलै रोजी राज्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली. त्यामध्ये मोठं नुकसान झालं आहे. यवतमाळ, बुलढाणा, वाशीम येथे मोठ्या प्रमाणत नुकसान झालं आहे. याठिकाणी मंत्र्यांनी भेटी दिल्या आहेत. या ठिकाणच्या ११० लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. वायूदलची देखील मदत घेण्यात आली होती. पाणी पातळीत वाढ झाल्याने अनेक ठिकाणी रस्ते बंद झाले होते. अशा ठिकाणीं बचाव कार्य करण्यात आले. इथ ३० लोकांना वाचवण्यात आलं आहे. पूर्णा नदीला पूर आल्याने अनेक ठिकाणीं २० ते २५ लोक अडकले होते. त्यांना बाहेर काढण्यात आलं आहे. त्यासाठी एनडीआरएफ एसडीआरएफ यांची मदत घेण्यात आली. ज्या ठिकाणी पूरपरिस्थितीमुळे मृत्यू झाले आहेत त्या ठिकाणी मृताच्या नातेवाईकांना चार लाख रुपये तातडीने द्यावेत असे आदेश दिले आहेत. ज्यांच्या घरात पाणी शिरले होते त्यांना १० हजार रुपये मदत करण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. राज्य सरकार नुकसानग्रस्तांच्या पाठीशी असल्याचं सांगत अजित पवार म्हणाले की, ज्या ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे त्या ठिकाणी स्वस्त धान्याच्या दुकानातून आजच धान्य पुरवठा सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच पुराच्या ठिकाणी रोगराई पसरू नये यासाठी स्वच्छता करण्यात येणार आहे आणि त्या ठिकाणी स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

# मारहाणीत जखमी युवकाचा मृत्यू ; संशयितांना अटक

**शिरपूर । प्रतिनिधी**

दोघांनी बेदम मारहाण केल्याने रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या युवकाचा मृत्यू झाला. त्याच्या खुनाच्या संशयावरून दोघांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी संशयितांना अटक केली.

बलकुवे (ता. शिरपूर) येथे ही घटना घडली. ज्ञानेश्वर गयबू पाटील असे मृत युवकाचे नाव आहे. १७ जुलैला त्याला मारहाण करण्यात आली होती. त्यात जखमी झाल्याने १८ जुलैला दुपारी त्याला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. २१ जुलैला दुपारी धुळे येथील हिरे वैद्यकीय महाविद्यालयात त्याचा मृत्यू झाला. मृत ज्ञानेश्वरचा दोन वर्षांपूर्वी पत्नीशी घटस्फोट झाला होता. गावातील अरुणा भिल हिच्या गावठी दारूच्या अड्ड्यावर तो गेला होता. तेथे संशयित अर्जुन भिल व सागर भिल (दोघे रा. बलकुवे) यांनी त्याच्या पत्नीच्या चारित्र्याबद्दल बदनामीकारक उल्लेख केला. मात्र रात्री साडेआठला अर्जुन भिल व सागर भिल दोघेही रामचंद्रच्या घरी आले. तेथे ज्ञानेश्वरशी भांडण उकरून काढत मारहाण केली. सागरने त्याला उचलून कॉंक्रिट रस्त्यावर आपटले. त्याच्या डोक्यात लोखंडी पाइपाने वार केले.

## निर्यात घटण्याचा धोका

या वर्षी फेब्रुवारी महिन्यापासून भारताची एकूण निर्यात सतत घटत आहे. जूनमध्ये तीन वर्षांतील नीचांक गाठला गेला. तांदळाच्या निर्यातबंदीने निर्यात अधिक घटेल, यात शंका नाही.

बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीवर केंद्र सरकारने बंदी घातली आहे, ती तातडीने अमलात आली आहे. गिरण्यांमध्ये स्वच्छ केलेल्या व निम स्वच्छ केलेल्या तांदळाच्या बाबतीतही ही बंदी लागू आहे. सरकार त्याचे वर्णन 'पांढरा तांदूळ' असे करते. देशांतर्गत बाजारपेठेत पुरवठा वाढवणे व तांदळाच्या दरात होत असलेली मोठी वाढ रोखणे या हेतूने ही उपाययोजना करण्यात आली आहे हे उघड आहे. जूनमध्ये बिगर बासमती तांदळाच्या किंमती ११.७८ टक्क्यांनी वाढल्या. एका महिन्यात ही दरवाढ सुमारे तीन टक्के होती. किरकोळ बाजारात प्रतवारीनुसार तांदळाचा प्रति किलो दर ५५ रुपये ५१ पैसे ते १७९ रुपये ६४ पैसे असा आहे. मात्र, गेले वर्षभर दुहेरी अंकात तांदळाचे दर वाढत आहेत. यंदा पाऊस उशिरा सुरु झाल्याने भाताची पेरणी लांबली. खरीप हंगामातील तांदूळ तयार होऊन बाजारात येण्यास अवधी आहे. मधल्या काळात तांदळाचे दर अजूनही वाढू शकतील हे लक्षात घेऊन बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. घरगुती बाजारात बिगर बासमती तांदळाचे दर कदाचित कमी होतील; पण सरकारच्या निर्यातबंदीच्या घोषणेने जागतिक बाजारपेठेत या तांदळाचे दर लगेच वाढले. देशाच्या अर्थ व्यवस्थेवर या निर्यातबंदीचा परिणाम लवकरच दिसेल.

प्रतिमेला धक्का

गेले दशकभर भारत हा तांदळाचा सर्वात मोठा निर्यातदार आहे. जागतिक व्यापारात भारताचा हिस्सा ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. भारतातून निर्यात होणार्या तांदळापैकी ८० टक्के हिस्सा बिगर बासमती तांदळाचा असतो. चीन जरी तांदळाचा सर्वात मोठा उत्पादक देश असला तरी भारतातून चीन, बांगला देश, नेपाळ, इराण व अनेक आफ्रिकन देशांना तांदूळ विकला जातो. २०२२-२३ या वर्षात भारतातून तांदळाची एकूण निर्यात २ कोटी २३ लाख टन झाली. त्यातून ११ अब्ज १० लाख डॉलर्स मिळाले. त्यापैकी बिगर बासमती तांदळाची निर्यात १ कोटी ७७ लाख ८० हजार टन झाली. त्याचा हिस्सा ६ अब्ज ३५ कोटी डॉलर्स होता. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत २८ लाख ४० हजार टन तांदळाची निर्यात झाली. गेल्या वर्षीच्या या काळातील निर्यातीपेक्षा ती ६ टक्के जास्त आहे. ताज्या निर्यातबंदीने निर्यातीसाठी तयार असलेल्या ६० टक्के तांदळास फटका बसणार आहे. धान्य पुरवठ्याच्या जागतिक यंत्रणेवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होणार आहे. जरी थायलँड, व्हिएटनाम, पाकिस्तान, म्यानमार व खुद्द अमेरिका तांदळाची निर्यात करत असले तरी भारतीय तांदळाची निर्यात थांबल्याने निर्माण झालेली पोकळी कोणी भरून काढू शकणार नाही. गेल्या वर्षी तुकडा तांदळाच्या निर्यातीवर केंद्राने बंदी घातली. अन्य प्रकारच्या तांदळाच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लादले. तरीही देशांतर्गत तांदळाची भाववाढ थांबली नाही. यावर्षी मे महिन्यात साखरेच्या निर्यातीवरही बंदी घालण्यात आली. भारतीय समाजाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या दोन धान्यांचे दर आटोक्यात राहावेत यासाठी ही उपाय योजना करण्यात आली. यावर्षी पावसाळा उशिरा सुरु झाला. त्याने भाताच्या लागवडीखालचे क्षेत्र घटले आहे. त्यामुळे खरीप हंगामात तांदळाचे उत्पादन कमी होण्याची भीती आहे. २०२२-२३ या वर्षात तांदळाचे १३ कोटी ५५ लाख २० हजार टन असे विक्रमी उत्पादन झाल्याचे सरकार म्हणत आहे, मग निर्यात बंदीचे कारण काय? गव्हाचेही विक्रमी उत्पादन झाल्याचे सरकार म्हणाले. तरी गेल्या वर्षी मेमध्ये गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातली गेली. भारत जगास खाऊ घालू शकेल, असे पंतप्रधान म्हणाल्यानंतर ही बंदी जाहीर झाली. आगामी निवडणुकांपूर्वी गहू, तांदळाचे दर स्थिर राहावेत याची दक्षता सरकार घेत असावे; पण अशा बंदीमुळे उत्पादनाच्या सरकारी आकडेवारीविषयी संशय निर्माण होतो. तसेच निर्यातदार या नात्याने देशाच्या विश्वासार्हतेवर जगात शंका निर्माण होते. बाजारपेठ मिळवणे, ती राखणे यात खूप वेळ जातो; पण ती एका निर्णयाने गमावली जाते. मेमध्ये एकूण निर्यात १०.३ टक्क्यांनी, तर जूनमध्ये २२ टक्क्यांनी घटली आहे. तांदळाच्या निर्यातबंदीने ती आणखी घटेल.

# परिपक्व राजकारणी

एकेकाळी महाराष्ट्र, प्रशासनाच्या बाबतीत प्रगत राज्य म्हणून ओळखले जात असे; परंतु २०१४ पूर्वीच्या दशकात महाराष्ट्रात आघाडीचे शासन सुरू झाले. या काळात मुख्यमंत्री एका पक्षाचे, तर गृहमंत्री दुसऱ्या पक्षाचे; त्यामुळे होणाऱ्या निर्णायकी परिस्थितीचा गैरफायदा घेऊन राज्यातील कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत नाजुक बनली. जगातील सर्वात भीषण असा दहशतवादी हल्ला मुंबईवर झाला. समुद्रमार्गे दहशतवादी मुंबईत घुसले व त्यांनी तीन दिवस भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा सर्व व्यवहार ठप्प केला. शेकडो निरपराध व्यक्तींचे बळी घेतले. अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना या हल्ल्यात हुतात्मा व्हावे लागले. या हल्ल्यानंतर असेच अनेक दहशतवादी हल्ले, शस्त्रास्त्रांची खुलेपणाने वाहतूक, मादक पदार्थांचा मोठा व्यापार, गुन्हेगारांचे पोलिसांवरील वर्चस्व, कोणत्याही गुन्हेगारांना शिक्षा न होणे हे प्रकार सर्रास सुरू झाले. केंद्राप्रमाणेच राज्यातील भ्रष्टाचार एवढा वाढला की, त्यामध्ये शासनाचा एकही विभाग, एकही जिल्हा मोकळा राहिला नाही. त्यामुळे सामान्य माणूस जिकीरीला येऊन महाराष्ट्रात कायद्याचं राज्य आहे का? असे वैतागाने विचारू लागला.

या पार्श्वभूमीवर २०१४ मध्ये राज्यात भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवण्यात आली. मुख्यमंत्री होताच फडणवीस यांनी मुख्यमंत्री व गृहमंत्री ही दोन्ही पदे स्वतःकडे ठेवण्याचा निर्णय घेतला. गृहमंत्री म्हणून त्यांनी जाहीर केले की, पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या व नेमणुका याचे पूर्ण अधिकार महाराष्ट्र पोलीस दलाचे प्रमुख असणाऱ्या पोलीस महासंचालाकांना देत आहे. त्यामुळे विविध राजकारण्यांची मदत घेऊन भ्रष्ट पोलीस अधिकारी हव्या त्या ठिकाणी नेमणूक करून घेण्याला खीळ बसली. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे मनोबल वाढण्याला मदत झाली. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या भरतीत पारदर्शीपणा



आणून भ्रष्ट आधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना पोलिसात पोहोचायचे दरवाजे बंद झाले.

दहशतवादामुळे मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर अशा मोठ्या शहरांमध्ये अपप्रकार रोखण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करून अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा लावण्याचे अधिकार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीला देण्यात आले. त्यामुळे अवघ्या काही महिन्यांतच या सर्व महानगरातील सुरक्षा व्यवस्था बळकट होण्यास मदत झाली. तसेच पोलिसांच्या संरक्षणासाठी बुलेटप्रुफ जॅकेट्स घेण्याचा निर्णय करण्यात आला. यामुळे पोलीस अधिकाऱ्यांमध्ये सुसज्जता आली. नक्षलवाद्यांच्या कारवाया महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या गडचिरोली, गोंदिया या भागात थैमान घालत होत्या. या जिल्ह्यातील भ्रष्टाचारी राजकारणी, लोकोपयोगी कल्याणकारी योजना वंचित, शोषित, पीडित अशा वनवासी जनतेपर्यंत पोहोचू देत नव्हते. त्यामुळे नक्षलवाद्यांचा जोर वाढत होता. रस्ते, शिक्षण, आरोग्य, दळणवळण संबधी सर्व योजना ठप्प झाल्या होत्या. पोलिसांकडे प्रभावी शस्त्रांचा अभाव, बॉम्बपासून संरक्षण देणाऱ्या वाहनांचा अभाव, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या कामात अडथळा आणणाऱ्या बाबी दूर करण्यासाठी प्रशासनाचे पूर्णपणे असंवेदनशील धोरण त्यामुळे महाराष्ट्रातून कधी नक्षलवाद संपेल का? असा प्रश्न निर्माण झाला होता. त्यात भर म्हणून शहरी नक्षलवादी, सुशिक्षित अशा प्रतिष्ठित व्यक्तींच्या माध्यमातून या असंतोषात वाढ करीत होते. फडणवीस यांनी गृहमंत्री झाल्यावर पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी पोलिसांना पुरेशी प्रभावी शस्त्रास्त्रे, अन्य सामुग्री व धाडसी प्रशासकीय निर्णय घेतले. त्यामुळे गडचिरोलीत नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात ७० ते ७५ पोलीस कर्मचारी शहीद होण्याऐवजी ४० नक्षलवादी पोलिसांच्या कारवाईत ठार झाले. अनेक प्रमुख नक्षल नेते धारातीर्थी पडले. इतर अनेक शरण आले. त्याचबरोबर सामान्य जनतेची उपेक्षा संपून तरुणांना रोजगार, व्यावसायिक प्रशिक्षण, आरोग्य सुविधा, शालेय मुलींना सायकली अशी अनेक कामे होऊ लागली. त्यामुळे नक्षल कारवायांना प्रतिबंध होऊन विकासाची कामे होऊ लागली. माओवादाच्या नावाखाली नक्षल व्यक्ती आंबेडकरवादी चळवळीचा गैरवापर करत होते. हा त्यांचा कपटी डाव उलथून पाडण्यात आला.

धर्माच्या नावाखाली, जातीच्या नावाखाली समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न चालू होते. 'भारत तोडो' या मोहिमेचाच तो भाग होता; परंतु समाजातील सर्व घटकांच्या न्याय्य मागण्यांबाबत संवेदनशील राहून पंतप्रधान मोदी यांचा 'सबका साथ सबका विकास' ही घोषणा फडणवीस यांनी प्रत्यक्षात आणली. 'पोलीस मित्र' ही संकल्पना रुजवून महाराष्ट्रातील सामान्य जनतेला समाजघातक कारवायांविरोधी प्रयत्नांमध्ये हातभार लावायला फडणवीस यांनी प्रोत्साहन दिले. त्यामुळे महिलांविरुद्ध होणारे गुन्हे, अनुसूचित जाती-जमातींवर होणारे अत्याचार यात मोठ्या प्रमाणात घट झाली.

विकासासाठी शहरांची होणारी वाढ लक्षात घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नवीन पोलीस आयुक्तालये सुरू करावीत, अशी मागणी बरीच वर्षे होत होती. याचे गांभीर्य ओळखून मीरा-भाईंदर तसेच पिंपरी-चिंचवड या ठिकाणी नवीन पोलीस आयुक्तालये सुरू करण्यात आली. अतिरिक्त पोलीस महासंचालक यांच्या नेतृत्वाखाली समाजविरोधी गटांवर कारवाई होऊ लागल्याने त्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत झाली.

पूर्वी पोलीस अधिकाऱ्यांची वार्षिक गुन्हेविरोधी परिषद ही गृहमंत्र्यांच्या उपस्थितीशिवाय पार पडत असे; परंतु केंद्रात पोलीस महासंचालकांच्या वार्षिक परिषदेस पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहून मार्गदर्शन करण्याची प्रथा अमलात आली होती. याचे अनुकरण करून महाराष्ट्रातही पोलीस अधिकाऱ्यांच्या परिषदेस फडणवीस यांनी पूर्णवेळ उपस्थित राहण्याचे मान्य केले. त्यामुळे ही परिषद म्हणजे औपचारिकता न राहता त्यात दहशतवाद विरोध, नक्षलवाद विरोध, सायबर व आर्थिक सुरक्षा, महिला सुरक्षा अशा अनेक बाबींवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्याचा परिणाम होऊन जनसामान्यांचा शासनावरील विश्वास दृढ झाला. गुन्हेगारांना न्यायालयाकडून शिक्षा होणे हाच गुन्हेगारीस प्रतिबंध करण्याचा प्रभावी उपाय आहे, हे लक्षात घेऊन गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी पोलीस तपासात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर फडणवीस यांनी भर दिला. उउढछड प्रणाली यशस्वीपणे राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य झाले. न्यायवैद्यक संस्था मजबूत करण्यात आल्या. तुरुंग विभागात तुरुंगातून चालणाऱ्या अवैध प्रकारांना प्रतिबंध करण्यात आले. वरील धाडसी व धडाडीचे निर्णय हे केवळ फडणवीस हे एक परिपक्व राजकारणी असल्यामुळेच शक्य झाले. पोलीस अधिकाऱ्यांच्या चांगल्या हेतूने घेतलेल्या निर्णयांमागे फडणवीस खंबीरपणे उभे रहायचे, धाडस दाखवत असत. दिवसभर काम करून रात्री दोन वाजेपर्यंत काम करायचे व आलेल्या प्रत्येक संदेशाला त्वरित उत्तर द्यायचे, हा फडणवीस यांच्यातील विशेष गुण आहे. जनसामान्यांचे प्रश्न संवेदनाशीलपणे हाताळणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था उत्तम राखून विकासाला ते चालना देत असतात.

**- प्रवीण दीक्षित (निवृत्त पोलीस महासंचालक)**

# संकटे निसर्गनिर्मित की मानवनिर्मित?

मुंबईत गेल्या आठवड्यापासून 'नेमेचि येतो' म्हणत धो धो पाऊस पडला. अगदी चार महिने धो धो बरसत असतो. मात्र एका ठरावीक कालावधीत तो इतका पडतो की, सर्व काही ठप्प होते, आता हे इतके अंगवळणी पडले आहे. खूप हाल झाले नाहीत, सारे काही ठप्प झाले नाही, काही अघटित काही घडले नाही, पाऊसच पडला नाही किंवा पाऊस कमी पडला, अशी आपण मनाची समजूत घालतो. पाऊस हा मनाला आनंद देणारा, सुखाच्या आनंदमयी सरी शिंपडणारा वाटला पाहिजे. मात्र तो आनंददायी न वाटता त्या वर्षी आपल्या वाट्याला आलेले कटू व भीतीदायक अनुभव व त्यातून आपण कसा मार्ग काढला, याचे गुणगान करत परत पुढल्या वर्षी येणाऱ्या पावसाची वाट बघतो. इतके आपले मन आता कोरडे झाले आहे! आपल्याला आता कशाचे काहीच वाटेनासे झाले, असे वाटू लागले आहे काय? पाऊस या सगळ्यांचा जगण्याचा एक अविभाज्य भागच आहे. मात्र पावसाळ्यात आपल्या आजूबाजूच्या घटना बघितल्या, तर पावसाचा आनंद वाटण्यापेक्षा त्याची भीती जास्त वाटू लागते, अशी आजची परिस्थीती आहे. त्यात आज माहिती तंत्रज्ञान क्रांती, मोबाइल क्रांतीनंतर जी गोष्ट आपल्याला दुसऱ्या दिवशी कळत होती, ती त्याच क्षणी चटकन कळते व दिसते सुद्धा. पावसाळ्यात तर पाण्यात वाहून जाणे, धबधब्याखाली, समुद्रकिनारी लाटांमध्ये फसणे, गटार, नाल्यात पडणे, झाड किंवा फांदी अंगावर पडणे अशा गोष्टी हमखास घडत असतात. मात्र आता डोंगर कड्याखाली गावच्या गाव गाडली जाणे अशा भयानक गोष्टी घडू लागल्या आहेत. यापैकी काही गोष्टी टाळणे जरी आपल्या हातात नसले, त्या निसर्गकोपामुळे घडलेल्या असल्या तरी काही गोष्टी मात्र टाळणे आपल्या हाती होते, असा विचार केल्यास जाणवू लागेल.


मानवाच्या हव्यासापोटी निसर्गाची मोठी हानी करून स्वतःच्या ऱ्हासाला स्वतःच कारणीभूत ठरलो आहोत, हे आपल्याला एव्हाना कळून चुकले आहे. आता वेळही टळून गेली आहे. निसर्गावर घाव घातला, तर निसर्गही आपल्याला तोडीस तोड उत्तर देत आहे. तरीही आपण एवढे ढिम्म का? दरवर्षी आपण कधी ना कधी पावसात अडकतो, रेल्वे बंद होतात, रस्त्यावर पाणी असते, रस्ते बंद होतात, सर्व काही ठप्प होऊन जाते. मग असा प्रश्न पडतो की, यात निसर्गाला दोष द्यायचा की मानवनिर्मित चुकांना? पाऊस किती पडावा हे जरी आपल्या हातात नसले तरी नाले, गटारी व्यवस्थित साफ झाले की नाही, की नेहमी थातुरमातूर पद्धतीने कामे केली जातात का? मग यात दोष कोणाचा? मुंबईचा विचार व आकारमान पाहता मुंबई ही एकेकाळी फक्त बेटांची होती. आजही तीन्ही बाजूला पाणीच पाणी आहे. बशीचा आकार वगैरे वगैरे आपण अशी कारणे किती वेळा पुढे करणार आहोत? काळानुरूप आधुनिक तंत्रज्ञान आले, तंत्रज्ञानाचा वापर आपण करून यावर कायमस्वरूपी तोडगा काढणार की नाही? मिठी नदीला २६ जुलै रोजी पूर आला होता. त्या नदीने आपले अक्राळविक्राळ रूप दाखवून मुंबईतील आपल्या अस्तित्वाची जाणीन करून दिली होती. मिठी नदी साफ करण्यासाठी, तिची खोली वाढवण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी करदात्यांच्या पैशातून ओतला जातो. मात्र आजपर्यंत या नदीचा प्रश्न सुटल्याचे ऐकिवात नाही. पावसाळ्यात रस्त्यांवर पडणारे खड्डे हे नेहमीचेच आपल्या वाट्याला येतात? मग या खड्ड्यात पडून एखाद्या दुचाकीस्वरांचा नाहक बळी जातो. खड्ड्यांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते, नाहक मानवी मनुष्यहानी होते. कोणाला वेळेवर न पोहचता आल्याने त्यांचे प्रचंड नुकसान होते. कोणाचे वर्ष वाया जाते, न भरून निघणारे नुकसान होते. मात्र त्याची सवय झालेलीच आहे असे म्हणण्यापेक्षा सवय करून घेतलेली बरीच! आपल्यापेक्षा कमी प्रगत असलेल्या अनेक देशांत या पावसाच्या नुकसानीवर इलाज शोधून काढण्यात आले आहेत. आपल्या देशात पावसात खड्डे पडतात, मात्र इतर देशात का पडत नाहीत. एवढाच विचार आपल्या डोक्यात येतो का? मग आपल्याकडे रस्त्यांसाठी खर्च केल्या जाणाऱ्या पैशांत भ्रष्टाचार होतो, त्यासाठीची पूर्ण रक्कम वापरली जात नसावी, अशी शंका येते. हे असेच चालत राहणार, असे आपण म्हणतो व पुढे चालतो आणि पावसाला दोष देत पुढे सरकतो.

पाऊस सुरू झाला की पडझड झाल्याच्या बातम्या आपण ऐकतो, वाचतो. इमारतीचा भाग कोसळला, इमारत कोसळली, शासनाने धोकादायक ठरवले असतानादेखील माणसे मात्र त्यात जीव मुठीत घेऊन राहतात. त्यांचीही अगतिकता असते. कारण आपण आपली मूळ जागा सोडून गेलो, तर शासन त्यावर कब्जा करेल, आपली मूळ जागा गमावून बसू अशी भावना मनात निर्माण होते. धोकादायक असूनही त्यात राहतात व अपघात झाल्यास जीव गमावून बसतात. वर्षंनुवर्षे हेच होत आहे. पूर्वी असे म्हणायचे की, झाड किंवा फांदी कोणाही मानवाच्या अंगावर पडत नाही. मात्र हल्लीच्या दिवसांत एकदा तरी कोणाच्या तरी अंगावर फांदी अथवा झाड पडून त्याचा मृत्यू होतो, झाडांच्या फांद्या, धोकादायक झाडे वेळोवेळी कापली, तर असे प्रसंग घडणारच नाहीत. मात्र नशिबाचा भाग म्हणून सोडून देतो.

धबधब्यावर जाणे, त्याचा आनंद घेणे, सहकुटुंब नवनवी ठिकाणी साजरे करणे यापूर्वी हमखास व्हायचं. मात्र दारू पिऊन धिंगाणा घालणे, दारू पिऊन पाण्यात उतरणे व आपल्यासोबत इतरांचाही जीव धोक्यात घालणे. यामुळे पावसाळी पर्यटनाला गालबोट लागते. दोन-चार नादान माणसांमुळे पावसाळी पर्यटन बदनाम होत चालले आहे. यात दोष कुणाचा? पावसाचा की मनुष्याचा? आपण मात्र पाऊस पाण्याला दूषणे देत पुढे जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शेतकऱ्यांना भरघोस मदत करण्याच्या भूमिकेमुळे त्यांचे जीवन सुसह्य झाले आहे. मात्र याच शेतकऱ्यांची पावसाच्या वेळी परीक्षा असते. पाऊस नाही पडला, तर कोरडा अति पडला तर ओला दुष्काळ. मग त्यातून सुरू होतात आत्महत्येच्या घटना. वर्षांनुवर्षे हे चक्र सुरू आहे. हवामान खात्याने पावसाचा अंदाज सांगितल्यावर पेरण्या होतात, पाऊस नाही पडला तर दुबार पेरण्या होतात. नुकसान मात्र शेतकऱ्यांचेच होते. पाऊस जास्त झाला, तर या पेरणी करपण्याचीच जास्त चिंता शेतकऱ्यांना असते. मग शेतकऱ्यांसाठी मोठी मदत घोषित होते. मात्र ती त्यांच्यापर्यंत पोहोचते का? ती सुद्धा आपल्याला विचार करण्यासारखी गोष्ट आहे. पावसाचा अंदाज जरी नीट वर्तवला आला तरी आपण बऱ्याच समस्या सोडवू शकू. मात्र आपल्याकडे जेव्हा पाऊस जोरदार पडणार, असे सांगून शाळा बंद ठेवाव्या लागतात. त्याच दिवशी ऊन पडते. ज्या दिवशी पाऊस साधारण पडणार, असे सांगितले जाते त्या दिवशी अतिवृष्टी होते. वर्षांनुवर्षे हेच होत आहे. यासाठी हवामान वर्तवणारी यंत्रणा एकदम परफेक्ट असावी. कधीतरी अंदाज चुकला, तर मात्र सर्वांचीच दाणादाण होते. प्रचंड नुकसान होते, जीवितहानी होते. यावर्षी संपूर्ण देशभरानेच अगदी दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत सर्वांनी या पावसाच्या रौद्रवताराचे दर्शन बघितले आहे. यात मानवी चुका कोणत्या व कोणत्या निसर्गनिर्मित हे प्रत्येकाने ठरवायचे आहे? पाऊस आपल्या हातात नसला तरी विचार करणे तरी आपल्या हातात आहे.

**- मुंबई डॉट कॉम : अल्पेश म्हात्रे**

## शब्दकोडे-१३०



आडवे शब्द

१. संत्र्यांचे शहर! ४. आतील गोटातील ७. मर्यादा ११. दशरथपुत्र १२. सोबत, संगत १३. भारतीय चलन १५. धनुष्याच्या दोरीचा आवाज १६. श्वापद १८. रत्न १९. पारोपकार म्हणजे पुण्य असेल तर परपीडा म्हणजे- २०. घातलेली भीड २१. उगीच २४. सामोपचार २६. नेहमी, अखंड २८. छोटी लढाई ३०. मानसन्मान ३२. भांडण ३४. पाण्याचा उसळलेला तरंग ३५. आम टी, वरण घेण्याचे पात्र ३६. नवीन ३७. मजबूत, दणकट ३९. वस्त्र, वसन ४०. फ ूल ४३. कोवळा अंकुर ४४. व्रत ४६. पाठपुरावा, शोध ४७. एकदम उडालेली धार ४८. कडक व चिवट ४९. तात, जन्मदाता ५०. यमलोक ५१अ. निकाली शेवट ५२. अनाठायी धाडस ५४. पप्पा, डॅडीपेक्षा हे संबोधन चांगले ५५. शाब्दिक चकमक ५९. अलमारी ६१. क्रिया घडवून आणणारा, सहाय्यक ६३. सावकाश, हळू ६४. अमावस्या ६६. विरुद्ध, उलटे ६९. बाज, खाट ७२. पातळ खांब ७३. गोष्टी सांगणे ७६. घालमेल ७८. क्रमांक ७९. मृत्यूदेवता ८१. गाडीचे छत ८३. सैन्याचा माल पुरवठा ८४. अफरातफर, गैर उद्योग ८५. प्रतिबिंब दाखवणारा

उभे शब्द

१. निराश, रूसलेला २. येरझारा, जाणेयेणे ३. खोडण्याचे साधन ४. आकाश ५. शहाणा, हुशार ६. झाड ७. मूळ आधार ८. वितरण ९. वाळवंट १०. अखेरीस १४. सांभाळणारा १७. माराची उमटलेली खूण १९. स्वयंपाकाचे शास्त्र २२. नृत्य २३. दरिद्री, कंगाल २४. चीजवस्तू २५. भर, राडारोडा २६. कारण २७. छोटी ताटली २९. जुगाराचा प्रकार ३१. चिंतन ३३. पादत्राण ३५. पूर्वज ३८. मंगलाष्टकातील पालुपद ४१. गंगेचे वाहन मानलेला जलचर ४२. शिव्याशाप ४५. फळावरील आवरण ४७. ममता, प्रेम ४७अ. प्रकरण ४८. चणचण, उणीव ५१. प्रवचनकार ५२. दिवसातून वा हंगामातून दोन वेळा ५३. खटला दाखल करणारा ५४. भलताच कठीण (प्रसंग) ५६. भांडण ५७. ढीग ५८. रविवार ६०. पाप ६२. चषक ६५. बडबड ६७. अर्धी ओंजळ ६८. पुष्पदल ७०. रावणाचे राज्य ७१. खादाड राक्षस ७४. थापा मारणारा ७५. डोळे ७७. आनंद ८०. नंतर ८२. टप्पा

### शब्दकोडे १२९ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.वळीव ३.मस ४.पराभव ७.राम ९.सावकार १०.वरपक्ष १२.पर १३.कापडचोपड १६.तपन १८.रासगरबा १९.खोपट २०.वाद २१.बाराखडी २३.खेटर २४.भरभर २६.पोप २७.तप २९.साक्ष ३०.संगीत ३२.दादला ३५.रम्य ३६.नशा ३८.चक्रवाक ४०.मालदार ४१.नवसागर ४२.चरक ४४.मनन ४५.मन ४६.चमक ४८.मधोमध ५०.रोज ५२.भरीत ५३.कळप ५४.नरम ५६.महाभारत ५८.मर्द ५९.टीका ६२.रती ६३.गजानन ६५.पाताळयंत्री ६८.चाकवत ६९.देव ७०.काळजी ७२.कव ७३.पो ७४.गबाळ ७६.वरदान ७९.रडारड ८०.सुवास ८१.मीन ८२.नरवीर

**उभे उत्तर**

१.१.वटका २.वऱ्हाड ३.मसाप ३अ.सवड ४.परतपरत ५.भवन ६.वर ७.राक्षस ८.बरबाद ९.साप ११.परान्नभक्षण १२.परवानगी १४.पसारा १५.चोपडी १७.पट १९.खोट २१.बारदान २२.खटला २३.खेप २५.रसा २६.पोक २८.परकर ३०.संकलन ३१.तगर ३३.दशानन ३४.चक्र ३७.ससाणा ३८.चरचरीत ३९.धोपटी ५०.रोम ५१.लोहा ५२.भरती ५३.कर्दनकाळ ५५.रसाळ ५६.मनकवडा ५७.भारत ५८.मजा ६०.कांपा ६१.संत्री ६३.गवगवा ६४.नळ ६६.तावदान ६७.यंदा ६८.चाकर ७१.जीवन ७५.बास ७७.नर ७८.तार

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# शिंगाडा तलाव येथील व्यापाऱ्यांच्या समस्यांबाबत आ. फरांदे यांची पोलीस उपायुक्त यांच्या सोबत बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**



शिंगाडा तलाव येथे व्यापारी व काम करणारे कर्मचारी यांच्यात संघर्ष झाल्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण होते. हे वातावरण निवळण्यासाठी आ. देवयानी फरांदे यांनी पुढाकार घेऊन शिंगाडा तलाव येथील व्यापाऱ्यांच्या समस्यांबाबत पोलीस उपायुक्त किरण चव्हाण यांच्या दालनात बैठकीचे आयोजन केले होते.

यावेळी उपस्थित व्यापारी वर्गाने त्यांच्या समस्या किरण चव्हाण यांच्यासमोर मांडल्या. शिंगाडा तलाव परिसरात व्यापार करत असताना येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी युनियन करून दहशत निर्माण केली असल्याची बाब त्यांनी उपायुक्त किरण चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिली. या कर्मचाऱ्यांनी दुकान मालकांनी कोणाला नोकरीवर घ्यायचे याबाबत देखील निर्देश देण्यास सुरुवात केली असल्यामुळे व्यापारी व कर्मचारी यांच्यात संघर्ष निर्माण झाला होता.

आ. देवयानी फरांदे यांनी शिंगाडा तलाव येथील व्यापारी हे त्यांच्या दुकानाचे मालक असून दुकानात कोणता व्यक्ती नोकरीस ठेवायचा हा सर्वस्वी त्यांचा अधिकार असल्याचे स्पष्ट करताना याबाबत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. तसेच व्यापाऱ्यांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण व्हावी यासाठी पोलीस विभागाने देखील कारवाई करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करताना या ठिकाणची ग्रस्त वाढवण्याची मागणी केली. तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील या ठिकाणी गस्तीला जाणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करताना या परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत असलेल्या समाजकंटकांवर कारवाई करण्याची मागणी आ. फरांदे यांनी केली. या भागात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी शिंगाडा तलाव भागात पोलीस चौकी स्थापन करण्याची मागणीही आ. फरांदे यांनी केली.

याबाबत बोलताना पोलीस उपायुक्त किरण चव्हाण यांनी व्यापारी पूर्णतः स्वतंत्र व संरक्षित असून त्यांना कोणी त्रास देत असेल तर त्यांनी तत्काळ पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, पोलीस त्यांना निश्चित संरक्षण देतील असे आश्वासन दिले. तसेच या भागात पोलीसगस्त वाढवण्यात येणार असून ते स्वतः देखील आठवड्यातून एक दिवस या भागात गस्त घालणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी शिंगाडा तलाव परिसरातील व्यापाऱ्यांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अधिक मास पोथी महिलांचा स्तुत्य उपक्रम : विजय बुरकुल

**सातपूर । प्रतिनिधी**

देवाजवळ मंदिरात जायला पुण्य लागतं, देवाजवळ टिकायला सेवा लागते, देवकृपा व्हायला नम्रता लागते,देव ओळखायला दृष्टी लागते,देव कळायला ज्ञान लागते,आणि ते ज्ञान ग्रंथ ऐकुन मिळते म्हणून अधिकमासाचे औचित्य साधून तुळजाभवानीमाता मंदिर जाधव संकुल सातपूर येथे सुरु केलेला अधिक मास पोथी श्रवणाचा जाधव संकुल महिला मंडळाचा उपक्रम स्तुत्य आहे असे विचार वास्तू विशारद व शिवसेना ठाकरेगट नाशिक शहर उप महानगर संघटक हभपश्री विजयशेठ बुरकुल यांनी मंदिरात कथेसाठी सदिच्छा भेट देताना व्यक्त केले.

धार्मिक कृत्य करणाऱ्या व्यक्तीचे कायिक,वाचिक,मानसिक पाप क्षालन होऊन मलदोष घालवतो म्हणून या महिण्यास मलमास असंही म्हणतात. असे यावेळी वारकरी महामंडळाचे अध्यक्ष हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी ही शुभेच्छा देताना म्हटले आहे.

याप्रसंगी श्री रामदास बनकर, महिंद्राचे श्री शिवाजी वाजे भोसरी पुणे आवर्जून उपस्थित होते.कार्यक्रमास सौ.अनिता बनकर, श्रीमती ठोंबरे, सौ. छाया बुरकुल,सौ.माळोदेताई,सौ. राऊत,श्रीमती घाटोळ मावशी सौ.पाटीलताई,सौ. ठाकरेताई,सौ. सलगरेताई,पुजारी सौ. कुटेताई सौ.अनिता वाघ,सौ.आगलावेताई,सौ. रावतेताई,आदी व असंख्य महिला पुरुष उपस्थीत आहेत.

# मनसे सैनिकांनी समृद्धी महामार्गावर सिन्नरचा टोलनाका फोडला

**अमित ठाकरे यांना अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करत घातला राडा**

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते तसेच महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे आणि मनसेचे वरिष्ठ पदाधिकारी दि. २२ जुलै रोजी संध्याकाळी अहमदनगरहून सिन्नरकडे समृद्धी महामार्गाहून येत असताना सिन्नर येथील समृद्धी महामार्गाच्या टोल नाक्यावर अमित ठाकरे यांचा ताफा अडवून त्यांना अर्धा तास थांबवून आणि ओळख देवूनही संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांना अपमानास्पद वागणूक दिली. असा आरोप मनसेने केला आहे. दरम्यान याचा निषेध करत संबंधित टोल नाका फोडण्यात आला.

टोल नाका कर्मचाऱ्यांच्या या अरेरावी आणि गैरवर्तनाचा सर्व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिकांना संताप आल्याने नाशिक शहर अध्यक्ष दिलीप दातीर तसेच महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे नाशिक शहर उपाध्यक्ष अक्षय खांडरे, मनविसे प्रदेश कार्यकारणी सदस्य शशी चौधरी, मनविसे प्रदेश कार्यकारणी सदस्य बाजीराव मते, शहर संघटक ललित वाघ, मनविसे निफाड तालुकाध्यक्ष तुषार गांगुर्डे, निफाडचे माजी तालुका अध्यक्ष शैलेश शेलार यांच्यासह मनसैनिकांनी होय आम्ही राग व्यक्त करणारच अशी भूमिका घेत समृध्दी टोल नाका प्रशासन यांचा जाहीर निषेध करत मनसे स्टाईल धडा शिकवत समृद्धी सिन्नर टोल नाका फोडला.

# रस्त्याच्या दुरवस्थेमुळे शाळकरी मुलांचे हाल

**लासलगाव । वार्ताहर**

लासलगाव शहरात तुरळक स्वरूपात रिमझिम पाऊस सुरू असल्याने लासलगाव महाविद्यालय व श्री महावीर विद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर जागोजागी पडलेल्या खड्ड्यात पावसाचे पाणी साचल्याने या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे, पालकांचे, शिक्षकांचे अतोनात हाल होत आहे.तसेच या रस्त्यावरून जाणारे दुचाकीस्वार देखील घसरून पडत असल्याने किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे.या रस्त्याची संबंधित बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्ती करावी,अशी मागणी मनसेचे लासलगाव शहराध्यक्ष अमित गंभीर यांनी केली आहे.



**लासलगाव शहरातील अनेक भागातील रस्त्यावर खड्डे पडलेल्या ठिकाणी पावसाचे पाणी साचू लागले आहे.खड्डे चुकविण्याच्या नादात वाहनचालकांकडून अपघात होऊ लागले आहेत.नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.संबंधित विभागाने या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी.**
**- अमित गंभीरे. मनसे शहराध्यक्ष, लासलगाव**

या रस्त्यावरून जाणारे लहान मुले, विद्यार्थी तसेच पालक या ठिकाणी पाय घसरून पाण्यात पडत असल्याने किरकोळ जखमी होण्याचे प्रमाण वाढू लागले आहे तसेच या साचलेल्या पाण्यातून गाडी गेल्यानंतर हे पाणी विद्यार्थ्यांच्या अंगावर उडत असल्याने दप्तर व गणवेश इत्यादी होत आहे. खराब होऊन विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.या रस्त्यावर वाहने घसरण्याचे देखील प्रमाण वाढू लागल्याने किरकोळ अपघातात वाढ होत आहे

लासलगाव शहरातील काही रस्ते व कॉलनी भागातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहे.नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उखडलेल्या रस्त्यामुळे आणि पडलेल्या खड्ड्यांमुळे ये-जा करणाऱ्यांना मोठा अडथळा होत असल्याने संबंधित विभागाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी मनसे शहराध्यक्ष अमित गंभीरे व पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# लासलगाव भाजप मंडलच्या वतीने जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांचा सत्कार

**लासलगाव । वार्ताहर**

भाजपाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांचा लासलगाव भाजप मंडल तर्फे सत्कार करण्यात आला.या वेळी शंकरराव वाघ यांनी सत्काराला उत्तर देताना आपला पक्षातला प्रवास,पक्षातले संघटनाचे महत्व आणि बूथ सशक्तिकरण यांचे महत्व सांगितले.



नाशिक मर्चंट बँकेचे संचालक प्रकाश दायमा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की शंकरराव वाघ गेल्या ३५ वर्षापासून पक्षाची एकनिष्ठ सेवा करत आहे त्यांच्या कामाची दखल घेऊन पक्षाने त्यांना न्याय दिला असल्याचे या वेळी नमूद केले. लासलगाव भाजप मंडल चे अध्यक्ष डी के जगताप यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की शंकरराव वाघ यांचे नेतृत्व आपल्या भागाला लाभल्यामुळे संघटन वाढीसाठी सर्व लासलगाव मंडलाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे डी के जगताप यांनी सांगितले.महिला मोर्चा ग्रामीणचे अध्यक्ष सुवर्णा जगताप आणि मंडलाध्यक्ष स्मिता कुलकर्णी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी लासलगाव मंडल अध्यक्ष डी के जगताप, नाशिक मर्चंट बँकेचे संचालक प्रकाश दायमा, राजेंद्र चाफेकर, भाजपा महिला मोर्चा ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णा जगताप, महिला मंडल अध्यक्षा स्मिता कुलकर्णी, मंडल उपाध्यक्षा रुपा केदारे, भारती महाले, शहराध्यक्ष शैलजा भावसार, योगिता आंबेकर, सोनाली शिंदे, मंडल सरचिटणीस निलेश सालकाडे, नितीन शर्मा, युवा अध्यक्ष निलेश जगताप, बापू लचके, टाकळी ग्रामपंचायत सदस्य केशव जाधव, धनंजय गांगुर्डे, जैन प्रकोष्ठ चे जिल्हा उपाध्यक्ष मनीष चोपडा, शीतल ताथेड, प्रीतेश अब्बड, वरून दगडे,अमोल बागमार, कोटमगाव चे सरपंच तुकाराम गांगुर्डे, लक्ष्मण खलसे, सुरेश पाथरे, राजू शेलार, इसाक रंगरेज, केशव पाथरे, कैलास जैन, खिलवाणी मामा, सुनील सांगळे, सादिक मुलानी तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

## राज्यात एका दिवसात १६५ टक्क्यांहून अधिक पाऊस

**नाशिक ।** राज्यात मुंबई-पुण्यासह कोकणात जोरदार पावसाचा अंदाज आहे. नाशिक व नंदुरबारमधील घाटमाथा परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार, मराठवाड्यात मध्यम, विदर्भात बहुतेक ठिकाणी जोरदार वारे वाहून तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज कुलाबा वेधशाळेने वर्तवला. मध्य महाराष्ट्रात १७.५ मिमी आणि कोकण आणि गोव्यात १४७.२ मीमी पावसाची नोंद झाली. राज्यातील अनेक शहरांत पाऊस होत असला तरी मराठवाड्यातील अनेक जिल्हे हे अजूनही कोरडेच असल्याचे चित्र आहे.

# यश कायमस्वरूपी स्थिर ठेवले पाहीजे- डॉ.केळकर

**नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचा विद्यार्थी गुणगौरव समारंभ**

**नाशिक । प्रतिनिधी**



दहावी व बारावीच्या परीक्षेत मिळालेल्या यशानंतर थांबायचे नसून कायम यश स्थिर ठेवल्यास व्यक्तीमत्वाचा विकास होऊन आयुष्यात यशस्वी व्हाल असे प्रतिपादन नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. भरत केळकर यांनी केले. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळातर्फे नाशिकरोड येथील पुरुषोत्तम इंग्लिश स्कुलच्या धामणकर सभागृहात डॉ. भरत केळकर बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. राजेंद्र कलाल होते.यावेळी हेमंत जोशी व कैलास निकम या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर सेक्रेटरी अश्विनीकुमार येवला, कार्यकारी मंडळाचे उपाध्यक्ष मारुती कुलकर्णी, जॉईंट सेक्रेटरी मयुर कपाटे, प्रसाद कुलकर्णी, कार्यकरी मंडळाचे सदस्य सुहास गायधनी, अलका कुलकर्णी, मिलींद कचोळे, अँकेडमिक बोर्डचे सचिव सुभाष पवार, रावसाहेब गायधनी, डॉ. सारंग इंगळे, पुरकर, प्राचार्य संजय चव्हाण, मुख्यध्यापिका सुचिता कुकडे, कार्यक्रम प्रमुख कामिनी पवार उपस्थित होते.

प्रास्तविक संस्थेचे सेक्रेटरी अश्विनीकुमार येवला यांनी केले. त्यांनी संस्थेतील गुणवंत शिक्षकांमुळे गुणवंत विद्यार्थी घडतात, असं सांगून गुणवंत विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेचे कुसुमाग्रज शिरडवाडकर, नाट्य अभिनेता गिरीश ओक तसेच देश-विदेशात असंख्य माजी विद्यार्थी मोठ्या हुद्यावर काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. राजेंद्र कलाल म्हणाले की, यशस्वी विद्यार्थ्यांच्या मुलाखती इतर मुलांसमोर घेतल्या जाव्यात तसेच त्यांच्या उत्तर पत्रिका अभ्यासल्या जाव्यात. यावेळी हेमंत जोशी व कैलास निकम या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन डॉ. प्राची सराफ व आरती कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रसाद कुलकर्णी करून दिला. आभार कार्यक्रम प्रमुख कामिनी पवार यांनी मानले.

---

**ॲड. संतोष बी. बोरसे, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

**आर.सी.एस. क्रं. ३३५/२०२२**

अकीब सय्यद बशीरअली सय्यद .....**वादी**

**॥ वि ॥**

जमीलाबी सय्यद हसन वगैरे- ...**प्रतिवादी**

ज्या अर्थी वादी यांनी धुळे येथील ज्यॉईंट सिव्हील जज्ज ज्यु. डी. सो. कोर्ट क्रं. ८ यांचे न्यायालयात प्रतिवादीं नं. २ अकील मुसा शेख, प्रतिवादी नं. ३ शकील मुसा शेख रा. धुळे ता. जि. धुळे व इतर दोन प्रतिवादी विरुध्द दिवाणी दावा दाखल केलेला आहे.

त्या अर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविण्याकरीता दिनांक १८/०८/२०२३ रोजी निश्चीत केले आहे. त्या अर्थी वरील प्रतिवादी यांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद, हरकत असल्यास ज्यॉईंट सिव्हील जज्ज ज्यु. डी. सो. कोर्ट क्रं. ८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन आपले म्हणणे मांडावे. किंवा वकीलांमार्फत हजर राहावे.

त्या अर्थी मे. न्यायालयाने निश्चीत केलेल्या तारखेपर्यंत कोणाचे उपस्थित झाली नाही तर सदर दाव्याचे कामकाज पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे शिक्यानिशी आमचे सहीनिशी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक:- १९/०७/२०२३ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** **कोर्ट नं. ८** — **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे**

---

**ॲड. योगेश एम. चितळकर**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ४ थे सह दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्थर यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८९९/२०२३**

१) रिंकल कैलास पाटील
२) श्री. रितेश कैलास पाटील
३) श्री. हितेश कैलास पाटील .....**अर्जदार**

**॥ आणि ॥**

१) कै. कैलास सदाशिव पाटील
२) कै. रत्नाबाई कैलास पाटील ...**मयत**

ज्या अर्थी अर्जदार यांनी वर नमुद मयतांचे कायेदशिर वारस या न्यात्याने शासकीय, निमशासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांचे कडील मयताच्या वारसासंबंधीच्या आवश्यक बाबींच्या पुर्ततेसाठी अर्जदारांचे नावे हेअरशीप सर्टिफिकेट मिळावे म्हणुन अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी वर नमुद केलेल्यनुसार मयतांच्या वारसाबाबत हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदारांचे नावे देण्यास कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी दि. २८/०८/२०२३ रोजी १० वाजता वरील निर्दिष्ट केलेल्या कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहुन मांडाव्यात अन्यथा यांच्या मागणीप्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

(शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** **दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे** — **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे**

---

**ॲड.योगिराज दिलीप सोनवणे, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व.स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र.८९४/२०२३**

१. रूखमाबाई उर्फ रखमाबाई वेडु पाटील
उ.व.-७८, धंदा-घरकाम
रा. बांबुर्ले प्र. नेर, खंडलाय खु., ता. जि. धुळे.
२. राधा मच्छिंद्र पाटील
उ.व.-५०, धंदा-घरकाम,
रा. प्लॉट नं. ७, अर्पन बंगलो, श्रीपाद रो-हाऊसेस मागे, कामटवाडे, खुटवड नगर, त्रिमुर्ती चौक, नाशिक.
३. विठोबा वेडु पाटील
उ.व.-३७ धंदा-खाजगी नोकरी
रा. आरएच नं. १, माऊली दर्शन आर्शिवाद नगर, महादेव मंदिराजवळ, सातपुर, लिंक रोड, नाशिक.
४. कै. विमलबाई जगन्नाथ पाटील (मयत) तर्फे वारस
४अ) कविताबाई आनंदा हालोर
उ.व.-२७, धंदा-घरकाम,
रा. मेन गल्ली, बेहेड, ता. साक्री, जि. धुळे.
४ब) सुभाष जगन्नाथ पाटील
उ.व.-२२, धंदा-हातमजुरी,
रा. चिंचवार, ता.जि.धुळे. .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**सामनेवाला**

**आणि**

कै. वेडु गणा पाटील (मयत)
मृत्यु दि. ०५/०३/१९९९
मृत्यु ठिकाण : बांबुर्ले प्र. नेर, ता. जि. धुळे. ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. वेडु गणा पाटील (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार हे कै. वेडु गणा पाटील (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि.१९/७/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ३०/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ८, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २१/७/२०२३ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** — **सहाय्यक अधिक्षक** **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

## न्यूज कॉलम

### भीमस्मृती यात्रेनिमित्त वृक्षारोपणाचे नियोजन

**धुळे ।** शहराजवळील लळींग किल्ला परिसरातील लांडोर बंगला येथे ३१ जुलैला भीमस्मृती यात्रा होणार आहे. त्यानिमित्त या ठिकाणी वृक्षारोपण व अन्नदान करण्याचा निर्णय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाच्या (खरात) बैठकीत झाला. पक्षाचे जिल्हाध्यक्ष विशाल पगारे अध्यक्षस्थानी होते. पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष किरणचंद्र ईशी, उत्तर महाराष्ट्र संघटक हेमंत पवार, विनोद केदार आदी उपस्थित होते. बैठकीत विविध कार्यक्रम घेण्यासाठी नियोजन झाले. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यात्रेला उपस्थित राहणारअसल्याची माहिती देण्यात आली.

### चाळीसगावरोडवर प्रतिबंधीत गुटखा जप्त

**धुळे ।** चाळीसगाव रोडवरील अंबिका हॉटेलजवळ ४३ हजार रुपये किंमतीचा विमल गुटखा, जाफरी जर्दा, पानमसाला, केशरयुक्त गोवा असे तंबाखूजन्य पदार्थ विक्रण्याच्या इराद्याने आलेल्या अन्सारी शब्बीर अहमद मोहम्मद तय्यूब याला अन्न सुरक्षा विभागातील अधिकारी आनंद भावराव पवार यांनी पोलीसांच्या मदतीने पकडले.

# सौर ऊर्जा क्षेत्राचे भवितव्य उज्वल

## केंद्रीय अपारंपारिक ऊर्जा आणि रसायने व खत राज्यमंत्री भगवंत खुबा यांचे प्रतिपादन



### नाशकात निमातर्फे संवाद कार्यक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**

सौर ऊर्जा क्षेत्राचे भवितव्य उज्वल असून येत्या पन्नास वर्षात या क्षेत्राला सातत्याने मागणी वाढणार आहे. केमिकल, फार्मा, हायड्रोजन या क्षेत्रात भविष्यात भारत जगाचे नेतृत्व करेल. चीनवर लोकांचा विश्वास राहिलेला नसल्याने संपूर्ण जग भारताकडे आशेने बघत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अपारंपारिक ऊर्जा आणि रसायने व खत राज्यमंत्री भगवंत खुबा यांनी केले.

नासिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या वतीने निमा सभागृहात ना.खुबा यांच्याशी संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मार्गदर्शन करताना खुबा बोलत होते. व्यासपीठावर खा.हेमंत गोडसे, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, चेंबरचे संजय सोनवणे, आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष रोहन उपासनी, लघुभारतीचे माजी अध्यक्ष संजय महाजन, निमाचे सचिव राजेंद्र अहिरे, रवींद्र झोपे, विरल ठक्कर, विजय जोशी आदी होते.

करोनाच्या काळात धास्तावलेल्या उद्योजकांना मोदी सरकारने २२ लाख कोटींची मदत केल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था आज तग धरून आहे. ही मदत केली नसती तर भारताची अवस्था शेजारी राष्ट्रांसारखी झाली असती असे ना.खुबा यांनी निदर्शनास आणले. आधीचे सरकार केवळ गरिबांच्या नावावर निवडून येत उद्योगांकडे ते दुर्लक्ष करीत. परंतु मोदी सरकारने औद्योगिक प्रगती बरोबरच देशाच्या विकासासाठी जी पावले उचलली त्याला निश्चितच तोड नाही. प्रत्येक घटकाच्या मागणी आणि समस्या केंद्र सरकार जाणून घेते. त्यानंतर गांभीर्याने विचार करून मदत करण्याचे निर्णय घेते. भारताचा जीडीपीचा दर ईतर देशांच्या तुलनेने चांगला आहे. महागाईचा दरही कमी आहे. भारतात थेट परकीय गुंतवणूक येण्याचा विक्रम झाला आहे. भारताचे अर्थव्यवस्थेचे जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आज गुणगान गात आहेत. आगामी २५ वर्षात भारताची अर्थव्यवस्था अव्वल क्रमांकावर दिसेल असे मी नाही तर जगभरातील अर्थतज्ञ सांगत आहेत याची आठवणही त्यांनी करून दिली.

प्रास्ताविक निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी केले. अपारंपारिक ऊर्जा, सोलर तसेच त्या संबंधित विविध मागण्या त्यांनी यावेळी केंद्रीय मंत्र्यांपुढे मांडल्या. सोलर ट्रेड फ्री झोन हवे, सोलर उत्पादकांना कर्जात सवलती मिळाव्यात यासह विविध मागण्यांचे निवेदन ना.खुबा यांना यावेळी सादर करण्यात आले. याबरोबरच त्यांनी नासिक येथे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर होत आहे. त्याच धर्तीवर सोलर मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर करताही केंद्र सरकार मार्फत प्राधान्य द्यावे असे आवाहन केले. या सर्व मागण्यांचा मी तसेच माझ्या खात्याचे अधिकारी अभ्यास आणि चर्चा करू, नियमात बसेल त्याप्रमाणे आपण शक्य ते सर्व करू असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. या संवाद कार्यक्रमास निमा, आयमा, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, लघु उद्योगभारती तसेच महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स प्रोसिएशनचे पदाधिकारी तसेच उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अत्यंत उत्साहात चर्चासत्र संपन्न झाले. पुढील भेटीत विशेष करून निमास प्राधान्य देईल, वेळ देईल. तसेच नाशिकच्या उद्योजकांशी चर्चा करायला मला नक्कीच आवडेल, आपल्या काही कुठल्याही समस्या-प्रश्न असल्यास आपण दिल्ली येथे भेटायला या. माझे संपूर्ण सहकार्य राहील असे आश्वासनही यावेळेस त्यांनी दिले.



# भीमस्मृती यात्रेनिमित्त मोहाडी पोलीस ठाण्यात झाली बैठक

**धुळे । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा चरणस्पर्श झालेल्या लळींग येथील लांडोर बंगला अर्थात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमस्मृती वन' परिसरात ३१ जुलै रोजी दरवर्षी हजारो भीम अनुयायी येत असतात. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असते.

यावर्षी देखील आंबेडकरी अनुयायी यावेळी मोठया संख्येने उपस्थित राहणार आहेत. यासंदर्भात नियोजनासाठी धुळे जिल्हा पोलिस प्रशासनाने लांडोर बंगला हद्दीतील मोहाडी पोलिस स्टेशन येथे डीवायएसपी ऋषिकेश रेड्डी व पीएसआय पाटील यांच्या उपस्थितीत आंबेडकरी समाजातील सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी यांची बैठक आयोजित केली होती. या वेळी बाळासाहेब वाघ, आनंद लोंढे, शंकर खरात, किरण गायकवाड, किरण जोंधळे, अनिलजी दामोदर, हरीशचंद्र लोंढे, प्रा.नागसेन बागुल, अरविंद निकम,ड.संतोष जाधव, बाबा शिंदे, संजय अहिरे, आबा अमृतसागर, दिनेश निकुंभे, विकी वाघ, राहुल वाघ, आबा बाविस्कर, सम्राट देवरे, सागर मोहिते, विशाल पगारे, विनोद केदार, सनी सोनवणे तसेच महिला भगिनी नैनाताई दामोदर, सरोजताई कदम, वंदना केदार, कल्पना सामुद्रे, सोनल मराठे, अंजनाताई चव्हाण आणि आंबेडकरी समाजातील विविध पक्ष, संघटनेतील पदाधिकारी, महीला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावर्षी देखील आंबेडकरी अनुयायी यावेळी मोठया संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# शहरात डोळ्यांच्या साथीने घातले थैमान

### बदलत्या वातावरणाचा परिणाम रुग्णालयांत रुग्णांची गर्दी

**धुळे । प्रतिनिधी**

मागील आठवडाभरापासून शहरात डोळ्यांच्या साथीने थैमान घातले आहे. परिणामी, शासकीय आणि खासगी रुग्णालयात संसर्गजन्य या आजाराच्या रुग्णांची मोठी गर्दी दिसून येत आहे. आवश्यक काळजी घेण्याचा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांकडून दिला जात आहे.

अनेक भागात या आजाराने थैमान घातले आहे. शहरातील विविध भागात असलेल्या अस्वच्छतेमुळे आणि बदलत्या वातावरणामुळे या आजाराने हातपाय पसरल्याचे बोलले जात आहे. डोळ्यांचा आजार हा संसर्गजन्य असल्यामुळे आरोग्य विभागापुढेही आव्हान उभे ठाकले आहे. डोळे लाल होणे, डोळ्यांतून पाणी येणे, चिपड येणे, डोळ्यांना खाज सुटणे, सकाळी उठल्यावर डोळे उघडता न येणे, पाणण्यांवर सूज येणे, अंधूक दिसणे आदी विविध प्रकारची लक्षणे डोळ्यांचा आजार झालेल्या रुग्णांत दिसून येतात. 'ॲडिनोव्हायरस' हे विषाणू अस्वच्छतेमुळे वाढल्याने हा आजार पसरत आहे. खोकला आणि स्पर्श अशा विविध कारणांनी हा आजार पसरत असल्याचे मत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

डोळे आल्यास काळ्या चष्म्याचा उपयोग करावा, दिवसातून किमान चार-पाचवेळा स्वच्छ पाण्याचे डोळे धुवावे, डोळ्यात ड्रॉप्स, मलम (आइनमेंट) वापरताना हात स्वच्छ धुवावे. डोळ्यांकरिता वापरलेले रूमाल गरम पाण्यात स्वच्छ धुवावे त्याचप्रमाणे डोळे आलेल्या व्यक्तीचे कुठलेही साहित्य वापरू नये. गर्दीच्या ठिकाणी डोळे आलेल्या व्यक्तीने जाऊ नये. रुग्णाने डोळे पूर्ण बरे होईस्तोवर कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर टाळावा, जीवनसत्त्वयुक्त आहार घ्यावा, औषधोपचारासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# मेकअप कार्निव्हल मध्ये सहा आंतरराष्ट्रीय आर्टिस्ट्सनी ब्युटिशियन्सना दिल्या टिप्स

### प्रशांत भावसार फेटेवाले यांचे उत्कृष्ट आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**






येथील मेकअप आणि ब्युटिशियन्सच्या क्षेत्रात प्रसिद्ध असलेले प्रशांत भावसार फेटेवाले यांनी मेकअप कार्निव्हल २०२३ भरवून आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहा आर्टिस्ट्सना धुळ्यात आणून त्यांचे मार्गदर्शन ब्युटिशियन्सना मिळवून दिले. मुंबई-आग्रा महामार्गावरील आलिशान हॉटेल गोल्डन लीफमध्ये या कार्निव्हलचे प्रशांत भावसार फेटेवाले यांच्यातर्फे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते. याशिवाय कार्निव्हल परिसरात विविध कॉस्मॅटिक व इतर उत्पादनांचे स्टल्स देखील लावण्यात आले होते.

ब्युटिशियन्स क्षेत्रात कार्यरत असलेल्यांना मेकअप बाबतची नवनवीन उत्पादने व त्यांची उपयुक्तता याची माहिती व्हावी. बदलत्या तंत्रज्ञानातील घडत जाणाऱ्या घडामोडी व उलाढाली याबाबत ब्युटिशियन्सना अवगत करावे या हेतूने प्रशांत भावसार हे दरवर्षी ब्युटिशियन्स क्षेत्रातील आंतर्राष्ट्रीत आर्टिस्ट व तज्ज्ञ व्यक्तींना आमंत्रित करून विविध सेमिनारचे आयोजन करीत असतात. या कार्यक्रमांना ब्युटी पार्लर्स चालविणाऱ्या महिला व संबंधितांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभत असतो. या वर्षी भावसार यांनी या मेकअप आणि ब्युटिशियन्सच्या क्षेत्रातील ॲडव्हान्स टेक्निकची माहिती आपल्याकडील महिलांना मिळावी या उद्देशाने मेकअप कार्निव्हल २०२३ चे हॉटेल गोल्डन लीफमध्ये आयोजन केले होते. या कार्निव्हल मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहा आर्टिस्ट्सना आमंत्रित करून त्यांचे मार्गदर्शन महिलांना मिळवून दिले. त्यामुळे महिलांना वेगवेगळ्या टिप्स एकाच छताखाली ऐकता व अनुभवता आल्या. या कार्निव्हलमध्ये धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, पुणे, यासह राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच राज्याबाहेरील बडोदासारख्या जिल्ह्यांमधूनही आर्टिस्ट व ब्युटिशियन्स सहभागी झाल्या होत्या.

# सुब्रतो मुखर्जी क्रीडा स्पर्धांचे धुळ्यात उद्घाटन

**धुळे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी धुळे व श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने सुब्रतो मुखर्जी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन सौ.अश्विनीताई कुणाल पाटील यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

धुळ्यातील एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात ह्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १७ वर्षाच्या आतील खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एम.टी. पाटील हे होते.उद्घाटन समारंभाला प्राचार्य एम.व्ही.पाटील,माजी क्रीडा संचालक सुधाकर पाटील,नरेश बागल, क्रीडा अधिकारी एम.के.पाटील, फुटबॉल असोसिएशनचे सचिव रईस काझी,क्रीडा शिक्षक मोहसिन शेख, एम.व्ही.पावरा,नितीन सोनार, शैबाज खान,आर्यन देसले आदी उपस्थित होते.

# जनजागृती करून साथरोगांना रोखण्याचा केला प्रयत्न

**धुळे ।** जिल्हा हिवताप अधिकारी व तालुका आरोग्यधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार विखरण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे शिरपूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात किटकजन्य व जलजन्य आजारांवर जनजागृती करण्यात आली. आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळण्याचे आवाहन करण्यात आले. मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आदी आजारांचे लक्षण, कारणे व उपायांची माहिती देण्यात आली. आरोग्य सहाय्यक के. बी. फुलपगारे, वैद्यकीय अधिकारी डॉ. धनश्री चौधरी, आरोग्य सेवक आर. डी. शिरसाठ, आरोग्य सेविका दिपाली बडगुजर यांनी मार्गदर्शन केले.

# ॲड. जुगणू गायकवाड यांची कन्या दिक्षाचे गेट परीक्षेत यश

### एमटेक शिक्षणासाठी निवड

**धुळे । प्रतिनिधी**

गेट मुख्य परीक्षेत दीक्षा गायकवाडचे यश ॲड. जुगणू व रेखा गायकवाड यांची कन्या दिक्षा गायकवाड नुकत्याच जाहीर झालेल्या गेट परीक्षेत घवघीत यश संपादन केले.

संपूर्ण देशभरातील विद्यार्थी या परीक्षेला सामोरे जातात यामध्ये दिक्षा चांगले मार्क मिळाले तिचे सर्वत्र कौतुक होत असून तिचे पुढील शिक्षणासाठी उत्तराखंड मधील आय आय टी रुरकी येथे निवड झाली आहे.



लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धिमत्ता व मेहनती असल्याने दिक्षाचे नातेवाईक तसेच सर्व स्थरावरून कौतुक केले जात आहे. दिक्षाचे आयआयटी मध्ये थर्मल मेकॅनिकल इंजिनिअर एमटेक शिक्षणासाठी निवड झाली आहे. तिचा हा यशस्वीसाठी मार्गदर्शन government engineering कॉलेज जळगाव येथील स्टाफ, तोशिब आणि एसएससीपीएस कॉलेजचे मेकॅनिकल डिपार्टमेंटचे मुख्याध्यापक संजीव सूर्यवंशी यांनी केले.

# खलाणे,निशाणे ते शिंदखेडा रस्त्यावरील साईटपट्टीवर खड्डे

**चिमठाणे । प्रमोद शिंपी**

खलाणे निशाणे ते शिंदखेडा रस्त्याच्या दरम्यान रस्त्याच्या कडेला साईड पट्टीवर भराव न टाकल्याने पावसाळ्यात अपघात होण्याची शक्यता आहे. सध्या डांबरी रस्ता व साईड पट्टी यामध्ये एक फुटापेक्षा जास्त खोल खड्डे निर्माण झाले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला गाडी उतरवणे कठीण झाले आहे.

साईड पट्टी खडीची बारीक रेती टाकली आहे. बांधकाम विभागाच्या नियमांनुसार साईड पट्टीही खाली एक ते दीड फुटा परेंत खोद काम करून डबर, खडी , मुरूम, टाकून रोलर फिरून त्यावर बारीक खडी नंतर रोलर फिरवले जाते. परंतु असे न करता पाच ते सहा इंच खोदकाम करून कोणताही भराव केलेला नाही व रोलर देखील व्यवस्थित रित्या फिरवला नाही. जोरदार पाऊस झाला तर ती वरची रेती ही वाहून जाईल रस्त्याची अवस्था ही परत जैसे थे होईल. या रस्त्यावर नेहमी वर्दळ



असल्याने दुचाकी, चारचाकी वाहने भरधाव वेगाने जातात. अशा वेळी ओव्हरटेक करून समोरून येणाऱ्या वाहनांपासून बचाव करण्यासाठी रस्त्याच्या कडेला साईड पट्टीवर गाडी उतरवणे गरजेचे असते; मात्र रस्त्याची रुंदी अपुरी आहे. या वेळी एका वेळेस फक्त दोन वाहने जाऊ शकत असल्याने वाहनांना ओव्हरटेक करायला अडचण निर्माण होते. यामुळे वाहने रस्त्याच्या खाली उतरवणे गरजचे असते; मात्र रस्त्याच्या कडेला भराव न टाकल्याने वाहनांचा अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील रस्त्याच्या कडेला साईड पट्टीवर भराव टाकावा, अशी वाहनचालकांची मागणी आहे.

शिवाय रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. परिसरातील नागरिक व वाहतूकदारसुद्धा याच मार्गाने यावे लागत असल्याने हा निकृष्ट होत असलेला रस्ता शासकीय नियमांनुसार करण्यात यावा, या रस्त्यावर फलक लावण्यात यावे, अशी जनतेची मागणी आहे. . या ठिकाणी असलेला हा खड्डा चुकवायला गेल्यास एकतर रस्त्याखाली जायची भिती अथवा मागून येणाऱ्या वाहनाने धडक देण्याची भिती निर्माण झाल्याने येथे अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सध्या डांबरी रस्ता व साईड पट्टी यामध्ये एक फुटापेक्षा जास्त खोल खड्डे निर्माण झाले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला गाडी उतरवणे कठीण झाले आहे. येथील रस्त्याच्या कडेला साईड पट्टीवर भराव टाकावा, अशी वाहनचालकांची मागणी आहे.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र





मंगळवार, दि. २५ जुलै २०२३

# शिवसेना वर्धापन दिनानिमित्त भजन महोत्सवाला उस्फूर्त प्रतिसाद












नाशिक ।
शिवसेना वर्धापन दिनानिमित्त नाशिक शिवसेना महानगरतर्फे भगवा महिना अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काल या भगवा महिना या कार्यक्रमाच्या समारोपानिमित्त शिवसेना नाशिक जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्यातर्फे भव्य भजन महोत्सवाचे आयोजन कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड येथे करण्यात आले होते. या भजन महोत्सवात नाशिक शहरासह जिल्ह्यातील भजन मंडळांनी उस्फुर्त प्रतिसाद देत ५१ मंडळनी यात सहभाग नोंदवला. महिला व पुरुष अशी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आली. ५१ भजनी मंडळातील सदस्यांपैकी ५७० महिला तर २९५ पुरुष सदस्य होते. यात सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, विठ्ठल पंताचे भाग्य थोर, देव माझा मी देवाचा, अंतरी विश्वास अखंड नामाचा, कधी येथील मनमोहना, रामकृष्ण गोविंद नारायण हरी, लख्ख पडला प्रकाश अशी विविध भजने मंडळांनी सादर केली. भजन महोत्सवाचे उद्घाटन शिवसेना सचिव, उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख भाऊसाहेब चौधरी, सह संपर्क प्रमुख राजू लवटे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रवीण तिदमे, मंगला भास्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख सुदाम डेमसे, शाम साबळे, प्रमोद लासूरे, अमोल सूर्यवंशी, योगेश बेलादर, रुपेश पालकर, दिगंबर नाडे, योगेश म्हस्के, बाबुराव आढाव, महेश जोशी, रोशन शिंदे, दिपक मौले, उमेश चव्हाण, शिवा ताकाटे, आनंद फरताळे, माजी नगरसेविका सुवर्णा मटाले, जयश्री खर्जुल, विशाल खैरनार, शरदचंद्र नामपूरकर, समीर देवघरे आदी शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त प्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून भजन महोत्सवास सुरवात करण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात मराठा हायस्कूलच्या जगतगुरु तुकाराम महाराज विद्यार्थी भजनी मंडळाने सादर केलेल्या भजनाने झाली. या भजन महोत्सवासाठी परीक्षक म्हणून पं. व्यंकटेश ढवण, प्रा. आनंद विष्णू आत्रे, अपर्णा देशपांडे, सागर कुलकर्णी यांनी परीक्षण केले.





दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना महसूल विभागातर्फे निरोप





















धुळे । जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची धुळे येथून नाशिक येथे जिल्हाधिकारी पदावर बदली झाल्याने त्यांना आज महसुल विभागातर्फे निरोप देण्यात आला. जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित निरोप समारंभाच्या कार्यक्रमास नूतन जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, मनपा आयुक्त देविदास टेकाळे, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, परिविक्षाधीन सनदी अधिकारी सत्यम गांधी, जि.पचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विवेक नवले, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, भूसंपादन अधिकारी तुकाराम हुलवळे, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार, सुलवाडे-जामफळ योजनेचे कार्यकारी अभियंता अभिजित पाटील, धुळे महानगरपालिकेचे उपायुक्त विजय सनेर यांच्यासह महसुल, जिल्हा परिषद तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. श्री. शर्मा यांनी त्यांच्या कार्यकाळात अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करतांना म्हणाले, दोन वर्षांपूर्वी कोरोनाची दुसरी लाट संपत होती आणि तिस-या लाटेची सुरुवात होत होती. त्यावेळी खुप मोठी आव्हाने होती. या कोरोना काळात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगली टीम मिळाल्यामुळे परिस्थिती चांगल्याप्रकारे हाताळता आली. अधिकारी तेव्हाच चांगले काम करु शकतात जेव्हा त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय यंत्रणा सक्षम असते. धुळे जिल्ह्यात जिल्हा परिषद, महापालिका, पोलीस विभाग तसेच इतर विभागाच्या सर्वांच्या सहकार्याने व प्रोत्साहनाने चांगले काम करता आले. शासनाने नाशिक सारख्या मोठ्या जिल्ह्यात काम करण्याची संधी दिली आहे. तेथेही चांगली कामे करण्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

संकलन : दिपक वाघ